*प्रतिष्ठेत,*

प्रिय ..........................................

आणि ..........................................

(येथे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची नावे, आई आणि वडील दोहोंची नावे लिहून हा अंक त्यांना वाचावयास देणे.. वाचून दाखविणे.)


लेंड-अ-हँड इंडिया

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ● जानेवारी २०१५

(फक्त खाजगी वितरणासाठी)

Lend-A-Hand India


## मनोगत

# कौशल्य शिक्षणाचे सार्वत्रिकरण

**सुनंदा माने** (कार्यकारी संचालिका, लेंड-अ-हँड इंडिया, पुणे)

महाराष्ट्र नेहमीच नव्या कल्पना आणि प्रयोग करण्यात पुढे असतो. तीन दशकांपूर्वीच ग्रामीण परिसराची गरज तसेच तरुणांना आत्मनिर्भरतेकडे नेण्यासाठी इंट्रोडक्शन टू बेसिक रुरल टेक्नोलॉजी (IBRT) जो आज आपण DBRT नावाने ओळखतो, सुरु करून डॉ. कलबाग यांनी असाच एक नवा प्रयोग केला. २००३ पर्यंत १९-२० शाळांमध्ये हा उपक्रम पोहोचला होता आणि त्याला शिक्षण मंडळाची ऐच्छिक विषय म्हणून मान्यताही मिळाली होती. शालेय वर्ष २००६-०७ मध्ये धामारी व न्हावरा या दोन शाळांपासून सुरुवात करून लेंड-अ-हँड इंडिया व विज्ञान आश्रम या दोन्ही संस्थांनी एकत्रितपणे IBT उपक्रम १०० शाळांपर्यंत नेण्याच्या उपक्रमास सुरुवात केली. आज हा कार्यक्रम महाराष्ट्रात शतकपूर्तीच्या जवळ पोहोचला आहे. तर लेंड-अ-हँड इंडियाने २०११ पासून तो देशातील चार राज्यांतील (कर्नाटक, गोवा, गुजरात, उत्तरप्रदेश) ३० पेक्षा जास्त शाळांपर्यंत पोहोचविला आहे. या राज्यांमध्ये सरकारी पातळीवर महाराष्ट्रासारखेच राज्य शिक्षण विभाग व शिक्षणमंडळ यांच्या मान्यतेबद्दल प्रयत्न सुरु आहेत.

२००६-०७ मध्ये प्लान-१०० उपक्रम सुरु करण्यामागील उद्देश हा होता की माध्यमिक शिक्षणात कौशल्य शिक्षणाचा अंतर्भाव व्हावा आणि तो सर्व प्रकारच्या शाळांमधून राबविता येतो (ग्रामीण शाळा, शहरी शाळा, मुलांची किंवा फक्त मुलींची शाळा, आश्रम शाळा, इत्यादी.) हे शासनाच्या, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे. त्याचबरोबर शंभर शाळांच्या या उपक्रमामुळे शालेय शिक्षणात कौशल्य शिक्षणाचे महत्व शासनास पटवून देऊन हा विषय ऐच्छिक न ठेवता माध्यमिकच्या ६०० मार्कांच्या विषयांपैकी एक विषय व्हावा हा देखील प्रयत्न होता.

नोव्हेंबर २०१४ मध्ये शासनाने मुलभूत तंत्रज्ञान या विषयास शिक्षण मंडळाच्या माध्यमिक परीक्षेत हा विषय १०० मार्काचा मुख्य विषय म्हणून समाविष्ट करण्यास मान्यता दिली आहे, ही आपणा सर्वांसाठी खूपच आनंदाची गोष्ट आहे.

हे सर्व होत असतानाच देश पातळीवरही २००८-०९ पासून माध्यमिक शिक्षणात व्यवसाय शिक्षणाचा समावेश व्हावा असा प्रबळ विचार सुरु झाला. त्यास २०१२-१३ मध्ये

*पुढील मजकूर पान २ वर*




**कच्छ येथे आयोजित स्वाधीन यात्रेनिमित्त बिदडा गावात जागरण-फेरी**

*सविस्तर वृत्त पान ३ वर*

पान १ वरून

## मनोगत

चांगलीच गती मिळाली. NSDA, NSDC, NSQF, सेक्टर स्किल कौन्सिल (SQL), इत्यादी अस्तित्वात आले.

माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि त्यासाठीचा एक उपाय म्हणून जीवन कौशल्य आणि रोजगार क्षमता विकास कार्यक्रम शिक्षणाचा अंतर्भाव माध्यमिक शिक्षणात करणे यांसाठी सातत्याने प्रयत्न करीत रहाणे हा लेंड–अ–हँड इंडिया संस्थेचा मूळ उद्देश आहे. कौशल्य शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हायला हवे, याबाबतही लेंड–अ–हँड इंडिया आग्रही आहे.

NSQF दर्जाच्या आवश्यकतेनुसार अभ्यासक्रमाची आणि परीक्षेची मानके ठरविण्यासाठी वेगवेगळ्या उद्योग समूहांनी आपापल्या विषयाची सेक्टर स्किल कौन्सिल स्थापन केली आहे, उदा. ऑटोमोबाईल, रिटेल, सिक्युरीटी, शेती. परंतु मल्टीस्किल म्हणजेच मुलभूत जीवन कौशल्ये हा विषय, खऱ्या अर्थाने सर्वांचाच पण त्यामुळे कोणाच्याच अधिकारात नाही, आपल्या भारतीय रेल्वे प्रमाणे !

२०१२ पासून लेंड–अ–हँड इंडियाने आपले सर्व लक्ष व बळ मल्टीस्किल अभ्यासक्रमाचा समावेश NSQF मध्ये व्हावा यासाठी केंद्रित केले. आज याचे फलित म्हणून NSQF दर्जाच्या आवश्यकतेनुसार मल्टीस्किल अभ्यासक्रम भोपाळ येथील पंडित सुंदरलाल शर्मा सेन्ट्रल इंस्टीट्युट ऑफ व्होकेशनल एज्युकेशनने प्रमाणित केला आहे. महाराष्ट्र शासनाने मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे महाराष्ट्रातील मल्टीस्किल या विषयात झालेल्या कामावरून हा विषय NSQF अंतर्गत विचारात घेतला जावा अशी शिफारस केली आहे, व सर्वात महत्वाचे म्हणजे, NSQF रचने अंतर्गत RMSA विभागातर्फे महाराष्ट्रातील ३५० सरकारी माध्यमिक शाळांमध्ये सुरु होणाऱ्या व्यावसायिक शिक्षण सुरु करण्याच्या प्रकल्पात मल्टीस्किल विषयाचाही समावेश असणार आहे. लेंड–अ–हँड इंडिया हरीयाणा राज्यामध्येही NSQF अंतर्गत या वर्षी काम सुरु करत आहे व तेथेही २० शाळांमध्ये मल्टीस्किल विषयाचा अंतर्भाव असणार आहे.

महाराष्ट्रात NSQF अंतर्गत व्ही–१ कसा समाविष्ट होईल, व्ही–१ चालविणाऱ्या शाळांना NSQF चा फायदा घ्यायचा असेल तर काय उपाय–योजना असतील या सर्व बाबतीत शासन पातळीवर लवकरच निर्णय होतील. इतके मात्र खरे की व्ही–१ अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व शाळांना NSQF अंतर्गत मान्य केलेला अभ्यासक्रम चालविणे खूपच सुलभ जाणार आहे व त्याच बरोबर देशपातळीवर येऊ घातलेल्या NSQF कोर्स पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी परतव्याच्या सवलतीचाही लाभ घेता येणार आहे. इथे मी व्ही–१ ची परवानगी घेतलेल्या पण उपक्रम न सुरु केलेल्या शाळांना असे सुचवू इच्छिते की त्यांनी २०१५–१६ मध्ये NSQF अटी प्रमाणे लेव्हल–१ व लेव्हल–२ चा अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार जरूर करावा. यात विद्यार्थ्यांच्या विकास व फायद्याबरोबर शाळेचीही भरपूर प्रगती होईल.

वरील वर्णिलेला सर्व प्रवास आपणा सर्वांच्या सहभागामुळे व सहकार्यानेच शक्य झाला आहे. महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षणात कौशल्य शिक्षणाचा समावेश याचा नुसता विचार न करता भविष्यवाणी ओळखून त्यावर प्रत्यक्ष कामही आपण सहा वर्षे आधीच सुरु केले होते, त्याबद्दल आपणा सर्वांचे अभिनंदन नक्कीच करायला हवे!

सन २०१५–१६ या शैक्षणिक सत्रापासून कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर नविन अभ्यासक्रम / नविन अधिकच्या तुकड्या सुरु करण्यासाठी; संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारा अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबतची जाहिरात लोकसत्ता वर्तमानपत्रात दि. १५ जानेवारी २०१५ रोजी प्रसिद्ध झाली आहे–

*जाहिरात*

**महाराष्ट्र शासन**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**३, महापालिका मार्ग, टपाल पेटी**
**क्रमांक १००३६, मुंबई-४०० ००१.**

सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रापासून कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम/ नवीन अधिकच्या तुकड्या सुरू करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

१) पूर्वव्यावसायिक अभ्यासक्रम (नवीन पुनर्रचित अभ्यासक्रम इ. ९ वी व १० वी)

२) +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एच.एस.सी. व्होकेशनल)

३) द्विलक्ष्यी व्यवसाय अभ्यासक्रम.

**अ)** अर्जाचा नमुना व माहितीपत्रक संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यांच्या कार्यालयात दिनांक १५.०२.२०१५ ते १४.०३.२०१५ या दरम्यान सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत उपलब्ध होतील व स्वीकारले जातील.

**ब)** विलंब शुल्कासह दिनांक १५.०३.२०१५ ते ३१.०३.२०१५ या दरम्यान सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत स्वीकारले जातील.

**ज. द. भुतांगे**
संचालक (व्यवसाय शिक्षण)

डीजीआयपीआर २०१४/२०१५/५३४५

तरी इच्छुक शाळांनी आपापले अर्ज वेळेत दाखल करावेत. आणि यासंदर्भात काही मार्गदर्शन हवे असेल तर लेंड–अ–हँड इंडियाच्या पुणे कार्यालयाशी (श्री. युवराज मोहोळकर, प्रकल्प समन्वयक – ९५५२५ ७९५५१) संपर्क साधावा.

# गुजरात मधील कच्छ येथे स्वाधीन-यात्रा

स्वाधीन प्रकल्पाविषयी जाणीव-जागृती करण्यासाठी तसेच सदर प्रकल्पात विद्यार्थ्यांनी शिकलेल्या कला-कौशल्यांचे प्रदर्शन करण्याची त्यांना संधी देण्यासाठी स्वाधीन-यात्रा आयोजित केली जाते. दि. १० जानेवारी २०१५ रोजी गुजरात मधील कच्छ येथील कच्छ युवक संघ संचालित श्री. बी.बी.एम. हायस्कूल, बिदडा येथे दिवसभर स्वाधीन यात्रा संपन्न झाली. कच्छ प्रांतातील ज्या शाळांमध्ये जीवन कौशल्य विकास आणि रोजगार क्षमता प्रशिक्षण उपक्रम राबविला जातो अशा शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद व्हावा, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे असा हेतू या यात्रेच्या आयोजनामागे होता.

कच्छमधील पुढील पाच शाळांनी स्वाधीन यात्रेमध्ये सहभाग घेतला-

कच्छ युवक संघ श्री. बी.बी.एम. हायस्कूल, बिदडा (सहभागी विद्यार्थी - ६८); श्री. एस. एस. कोडाय हायस्कूल, कोडाय, मांडवी (सहभागी विद्यार्थी - २०); विरायतन विद्यापीठ, जखानिया, मांडवी (सहभागी विद्यार्थी - २०); बी.एम. विद्यालय, मोटालायजा, मांडवी (सहभागी विद्यार्थी - २०); ए.जे. एस. हायस्कूल, भूजपुर, मुंदरा (सहभागी विद्यार्थी - ३७) अशाप्रकारे एकूण १६५ विद्यार्थी स्वाधीन यात्रेत सहभागी झाले होते.

स्वाधीन यात्रेची सुरुवात बिदडा गावात जागरण-फेरीने झाली. विद्यार्थ्यांनी यात घोषणा फलक हातात घेऊन अनेक घोषणा दिल्या : 'समय की पुकार सुनो, जीवन कौशल शिक्षण चुनो', 'दिकरा-दिकरी एकसमान (मुलगा- मुलगी एक समान)', 'पेहला विद्या-दान, पछी कन्या-दान' (बाल-विवाहाऐवजी स्त्री-शिक्षणाला प्राधान्य)' आदी.



एस. एस. कोडाय हायस्कूल, कोडाय, मांडवीचे विद्यार्थी स्वतः बनविलेल्या वस्तू श्री. महेंद्रभाई पटेल (जिल्हाधिकारी-कच्छ) यांना दाखविताना.



स्वाधीन यात्रेची सुरुवात दीप-प्रज्वलनाने करताना श्री. महेंद्रभाई पटेल (जिल्हाधिकारी-कच्छ), श्री. डी.एस. गोर(प्रतिनिधी, जिल्हा शिक्षण विभाग), श्री. दिलीपभाई देशमुख आणि श्री. पंकज शाह(बी.बी.एम. हायस्कूल)

स्वाधीन यात्रेचे उद्घाटन श्री. महेंद्रभाई पटेल, जिल्हाधिकारी, कच्छ यांच्या हस्ते झाले. जिल्हा शिक्षण कार्यालयाचे श्री. डी. एस. गोर उपस्थित होते, तसेच बी.बी.एम. हायस्कूलचे श्री. दिलीपभाई देशमुख आणि इतर ट्रस्टी देखील उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.पटेल यांनी उपक्रमाची प्रशंसा केली आणि प्रदर्शनातील प्रत्येक स्टॉलला भेट दिली. उद्घाटनाच्या समारोहात पंधरा मिनिटांचे एक छोटे नाटुकले सादर कण्यात आले ज्यात, आय.बी.टी.चे महत्व, फायदे तसेच प्रत्यक्ष कार्यक्रमाची अंमलबजावणी आदी बाबी दाखविण्यात आल्या. शिवाय एका विद्यार्थिनीने स्वाधीन प्रकल्पांतर्गत तिने आत्मसात केलेल्या कौशल्यांविषयी आपले अनुभव सांगितले. आपल्यातील सुप्त कौशल्ये आणि भावना यांना कशी वाट मिळाली हे तिने सांगितले.

स्वाधीन यात्रे दरम्यान भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध वस्तू मांडल्या होत्या, उदा. लाकडाचा ट्रे, लाकडाचे स्टूल, पेन-स्टँड, सुपली, लोणची, गुलाबाच्या सुकविलेल्या पाकळ्या, नक्षीकाम केलेले छोटे रुमाल, आदी. वस्तू विक्रीतून विद्यार्थ्यांना काही कमाईदेखील झाली. वस्तू-प्रदर्शनासोबतच पाणी-परीक्षण, माती-परीक्षण, रक्त-गट चाचणी आदी बाबींची सविस्तर माहिती तसेच प्रत्यक्ष कृती सादर करणारे स्टॉल्सही होते.

स्वाधीन यात्रेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाने आनंद झाला, उत्साह आला असे दिवसाच्या शेवटी आवर्जून सांगितले.

# इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी अभ्यासक्रम

शासनाच्या नविन धोरणानुसार आता इयत्ता ८ वी माध्यमिक स्तरातून वगळण्यात आली आहे आणि तिचा समावेश प्राथमिक स्तरामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे मुलभूत तंत्रज्ञानाची ओळख हा विषय आता फक्त ९वी आणि १० वी साठीच असेल. यापूर्वी तो ८वी मध्ये देखील शिकविला जात असे. मात्र आता नविन बदललेल्या रचनेमध्ये इयत्ता ८ वी मध्ये कार्यानुभव या विषयांतर्गत तीन उपविभाग समाविष्ट आहेत, त्यातील विभाग–१(समान अनिवार्य उपक्रम) सर्व शाळांमध्ये बंधनकारक आहे. उर्वरित दोन विभागांतील प्रसंगोपात व उत्पादक उपक्रमांतर्गत आय.बी.टी. (व्ही.–१) या वैकल्पिक विषयास पूरक असे उपक्रम सातारा जिल्ह्यातील नव्याने सुरु करण्यात झालेल्या ९ शाळांमध्ये राबविण्यात येत आहेत. यात मुलभूत तंत्रज्ञानाची ओळख या विषयाच्या ९ वी आणि १० वी मधील अभ्यासक्रमाची पायाभूत पूर्वतयारी करून घेण्यात येते. सदर इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी अभ्यासक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी परवानगी दिली आहे. या पूर्वतयारी अभ्यासक्रमातील उपविषय आणि त्यांचे सराव प्रकल्प पुढीलप्रमाणे आहेत–

**आहार, आरोग्य आणि व्यक्तिगत स्वच्छता** (अनेमिया आणि त्यावर उपाय; टाकाऊतून टिकाऊ; लोकरकाम; व्यक्तिगत स्वच्छता; सौर उर्जेचे महत्व आणि त्याचा वापर; पिण्याचे पाणी शुद्धीकरण व त्याचे महत्व; पोषण, पोषणाचे प्रकार आणि वजन व उंचीवरुन कुपोषण ओळखणे)

**अभियांत्रिकी कार्यशाळेमधील साधनांची ओळख व वापर** (साहित्य,साधनांची ओळख, सुरक्षिततेचे नियम; मापन, मापनाची साधने व रुपांतर; सुतारकाम– धार लावणे व दिवड पाडणे, लाकूड कापणे, लाकूड रंधणे, खिळ्याने जोड बसविणे, सनमायका लावणे; सोल्डरिंग करणे; बांधकाम – फेरोसिमेंट शीट तयार करणे, वीट बांधकाम करणे)

**ऊर्जा आणि पर्यावरण व जैविक विविधता** (विद्युत ऊर्जा; साधने, हत्यारांची ओळख; सांकेतिक चिन्हे; विविध वायर, केबल आणि स्वीच – ओळख; वायर गेज; वीज वाहक तारांचे जोड; साधे सर्किट, एकसर व समांतर जोडणी; ट्यूबलाईट वायरिंग; फ्यूज आणि त्याचे महत्त्व; जैवविविधता; शोष खड्डा तयार करणे)

**आधुनिक शेती व शाश्वत विकास** (रोप लावण्यासाठी कुंडी भरणे; सिडलिंग ट्रे मध्ये बी लावणे व रोप तयार करणे; कीड नियंत्रण – किडीपासून संरक्षण करण्यासाठी सापळे बनविणे; जैविक खते – गांडूळ खते, गांडूळ वॉश, शेण खत, हरित खत; कलमे व कलमाचे विविध प्रकार; दूध देणाऱ्या जनावरांचे संगोपन व वाढ, दुधाची गुणवत्ता शोधणे व भेसळ ओळखणे; विविध प्रकारची झाडे, झुडपे, पिके – त्यांच्या मुळांचा अभ्यास; परागीकरणाचे विविध प्रकार, परागीभवनाची विविध माध्यमे; गावातील बी – बियाणांची जैविक वैविध्य माहिती करून घेणे – सीडबँक तयार करणे; जलसंवर्धनाचे विविध प्रकार व त्याचे गुणधर्म व फायदे).

# सातारा येथे नक्षत्र प्रदर्शन

जानेवारी महिन्यात सातारा जिल्हा परिषदेच्या मैदानावर राज्यस्तरीय नक्षत्र प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये आयबीटी उपक्रम राबविणाऱ्या सातारा येथील पेरेंट असोसिएशन शाळेने (इंग्रजी माध्यम)भाग घेतला होता. त्यात आय.बी.टी.च्या चारही विभागांचा समावेश होता. चिक्की, पौष्टिक लाडू, गांडूळ खत, सुपली, पाट, नारळ सोलणी यंत्र, पिशव्या आदी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध वस्तूंचा प्रदर्शनासाठी आणि विक्रीसाठी प्रदर्शनांमध्ये समावेश केला होता.



सदर प्रदर्शन चार दिवसीय होते आणि या प्रदर्शनात एकूण २५० स्टॉल्स होते. या प्रदर्शनासाठी लोकांनी हजारोंच्या संख्येने हजेरी लावली. तसेच खास करून आय.बी.टी. उपक्रमाच्या स्टॉलला चांगला प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनात मांडलेल्या अनेक प्रकारच्या वस्तूंची विक्री झाली.

# पोषक शाळा प्रकल्प

लेंड–अ–हँड इंडिया आणि अशोका या दोन्ही संस्था एकत्रितपणे २०१५–१६ या शालेय वर्षामध्ये निवडक शाळांमध्ये पोषक शाळा प्रकल्प राबवत आहेत.

पोषक शाळा प्रकल्पांतर्गत सर्वेक्षणाची पहिली फेरी ऑगस्ट–२०१४ ते ऑक्टोबर–२०१४ या दरम्यान लेंड–अ–हँड इंडियाच्या सातारा जिल्ह्यामधील आठ शाळा आणि सांगली जिल्ह्यातील एका शाळेमध्ये करण्यात आली. या सर्वेक्षणामध्ये, गृह आरोग्य व शेती–पशुपालन निदेशकांच्या मदतीने विद्यार्थ्यांचे वजन, उंची, दंडघेर, हिमोग्लोबिन मोजले गेले, त्यांची वैयक्तिक माहिती घेतली गेली. या माहितीचे निष्कर्ष सांगण्यासाठी प्रत्येक शाळेमध्ये सभेचे आयोजन शाळेच्या मदतीने करण्यात आले. या सभेमध्ये पालक, आय.बी.टी.चे निदेशक, शाळेतील इतरही शिक्षक, विद्यार्थी आणि मुख्याध्यापक उपस्थित होते.

या निष्कर्षांमधील महत्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत–

एकूण ९ शाळांमधील ९४६ विद्यार्थ्यांपैकी ४५% विद्यार्थी कुपोषित आहेत आणि ५५% विद्यार्थी हे सामान्य आहेत. कुपोषित विद्यार्थ्यांमध्ये ३३% मुली तर ६७% मुले कुपोषित आहेत.

शाळेबाहेरील इतर पदार्थ जसे की चिप्स, कुरकुरे, चॉकलेट इ.पदार्थ ४१% विद्यार्थी आठवड्यातून २ ते ३ वेळा खातात, तर २३% विद्यार्थी आठवड्यातून ५ ते ६ वेळा हे पदार्थ खातात. ४२% विद्यार्थ्यांमध्ये हिमोग्लोबिन किंवा रक्ताचे प्रमाण हे १२.५ ग्राम/१०० मिली पेक्षा कमी आहे, तर ५८% विद्यार्थ्यांमध्ये हिमोग्लोबिन १२.५ ग्राम/१०० मिली किंवा त्यापेक्षा जास्त आहे. शाळेमध्ये हात धुण्यासाठी केवळ ४५% विद्यार्थी पाणी व साबणाचा वापर करतात, ५४% विद्यार्थी केवळ पाण्याने हात धुतात. तर १% विद्यार्थी हात स्वच्छ करण्याचे रसायन वापरतात. आठवड्यातून २ ते ४ वेळा आणि ५ ते ६ वेळा खेळणारे एकूण ८७% विद्यार्थी आहेत. परंतु आठवड्यातून फक्त एकदा, दोनदा किंवा कधीच न खेळणारे१३% विद्यार्थी आहेत.

पालकांना वरील माहिती दिली असता बऱ्याच पालकांनी रक्ताचे प्रमाण वाढवण्यासाठीचे उपाय विचारले. तसेच विद्यार्थी सर्व भाज्या खात नसल्याने त्यावरती उपाय विचारले. यावेळी त्यांना लोह व क जीवनसत्व असलेल्या पदार्थांची माहिती देण्यात आली, उदा. – मुख्यतः हरभऱ्याची कोवळी पाने, शेवग्याची कोवळी पाने, आवळा, लिंबू, लोखंडी भांड्याचा स्वयंपाकासाठी उपयोग करणे. तसेच काही पालकांनी आपल्या पाल्याला इतरही आजार असल्याची माहिती दिली जसे कि सतत चक्कर येणे, उंची न वाढणे. यासाठी त्यांना डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे सुचविण्यात आले. शाळांनीही शाळेमध्ये हात धुण्यासाठी साबणाची सोय करण्याचे आश्वासन दिले.



पालक सभेत मार्गदर्शन करताना लेंड–अ–हँड इंडियाच्या पोषण प्रकल्प अधिकारी सुनिता माने

## कर्नाटकातील अलूरच्या शाळेतील IBT विद्यार्थ्याच्या प्रकल्पाची राष्ट्रीय स्पर्धेत निवड

विज्ञान आणि तंत्रज्ञानविभाग, भारत सरकार यांच्या 'राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान–भारत (नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन–इंडिया)' द्वारा 'इग्नाईटस (Ignites)' या राष्ट्रीय स्पर्धेसाठी दरवर्षी इ. १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकडून सर्जनशील तांत्रिक कल्पना, अभिनव कल्पना सादर करण्यासाठी आमंत्रित केले जाते. त्यातून उत्कृष्ट अशा कल्पनांची निवड करून त्यांची स्पर्धा घेतली जाते आणि सर्वोत्कृष्ट संकल्पनांना पुरस्कार दिले जातात.

यंदाच्या 'इग्नाईटस (Ignites)' स्पर्धेसाठी कर्नाटक राज्यातील अलूर–नांगनूर (जिल्हा–बेळगाव) येथील पंचक्रोशी विद्यालयातील आय.बी.टी.चा विद्यार्थी प्रमोद बाळकृष्ण केसरकर याच्या 'कीटकनाशके फवारणी करण्यासाठी स्वयंचलित रोलिंग पंप' या अभिनव तांत्रिक संकल्पनेची निवड करण्यात आली आहे. प्रमोद केसरकर याचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

सदर स्पर्धेची निवड प्रक्रिया ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत आहे, तरी सर्व शाळांनी आपल्या आय.बी.टी.च्या विद्यार्थ्यांनी केलेले निवडक अभिनव प्रकल्प सादर करून या राष्ट्रीय स्पर्धेत भाग घ्यावा ही विनंती.

विजेत्यांची नावे दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजी घोषित करण्यात येणार आहेत. १५ ऑक्टोबर हा भारताचे माजी राष्ट्रपती आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा वाढदिवस असून तो दिवस 'मुलांची सर्जनशीलता आणि नवीन उपक्रमदिन'म्हणून साजरा केला जातो. अधिक माहिती संस्थेच्या वेबसाईटवर मिळू शकेल –

http://nif.org.in/ignite_announcement

हे करून पहा..

## आंबेगाव, पुणे येथील पोखरीच्या शाळेतील प्रयोग - दिया जलाओ, मच्छर भगाओ

कडूनिंब, निरगुडी, कळलावी, गारवेल यासारख्या आयुर्वेदिक वनस्पतींमध्ये किडनाशक, कीटकनाशक, बुरशीनाशक आणि वेदनाशामक गुणधर्म आढळून येतात. या वनस्पतींमध्ये असणाऱ्या रसायनांच्या गंधामुळे कीटक, डास जवळपास फिरकत नाहीत, दूर जातात. रासायनिक घटक असलेली महागडी उत्पादने (उदा. गुडनाईट, ऑलआउट) वापरण्यापेक्षा निरगुडी सारख्या सहज उपलब्ध होणाऱ्या वनस्पतीचा अर्क वापरून आपले डासांपासून संरक्षण होऊ शकते. अल्प उष्णतेमुळे अर्काचे बाष्पीभवन होऊन त्याचा गंध पसरतो, त्या दर्पामुळे डास दूर राहतात. बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांमध्ये टोलूक ॲसिड्स, थायोनिल क्लोराईड डाय इथिल अमाईन यासारखे विषारी घटक असतात, त्याऐवजी नैसर्गिक अर्क वापरणे कधीही उचितच आहे.

या प्रयोगासाठी अत्यंत सहज उपलब्ध होणारी साधने लागतात. एखाद्या छोट्या डब्बीत निरगुडीचा अर्क घ्या. ही छोटी डब्बी तुम्ही एखाद्या लहानशा स्टँडवर ठेवून त्याखाली मंद आच देणारी पणती किंवा निरांजन ठेवावे. थोड्या उष्णतेमुळे देखील अर्काची वाफ होते, ही वाफ बाहेर पडण्यासाठी डब्ब्याला छिद्रे ठेवा. दैनंदिन जीवनात उपयोगी असा हा प्रयोग अत्यंत अल्पखर्चिक असून दिव्याची पारंपारिक पद्धत पुरेशी ठरते, त्यामुळे विजेची बचतही होते.

**सदर प्रयोग श्री. पंढरीनाथ माध्यमिक विद्यालय, पोखरी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील आय.बी.टी.चा विद्यार्थी राजेंद्र नंदलाल चौहान याने रत्नागिरी जिल्ह्यात आयोजिलेल्या ४० व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सादर केला. त्यासाठी त्याला विज्ञान शिक्षक श्री. मुहम्मद मुलाणी यांनी मार्गदर्शन केले. या प्रयोगाची निवड राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी माध्यमिक आदिवासी गटातून झाली आहे. राजेंद्र चौहान आणि मुलाणी सर दोहोंचे अभिनंदन आणि शुभेच्छा!**

## अभ्यासासाठी टिप्स

**विद्यार्थी मित्रांनो,**

आता शैक्षणिक वर्ष सरत आले आहे. सहली, विविध स्पर्धा, क्रीडा महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आदी सारे आता मागे पडले आहे आणि लवकरच परिक्षा सुरू होतील. आणि म्हणून परीक्षेच्या दृष्टिने महत्वाच्या असलेल्या काही टिप्स...

- आपला अभ्यासक्रम, पेपर पद्धती, गुणांचे विभाजन लक्षात ठेवून व्यवस्थित उजळणी करा. आपल्या शिक्षकांना भेटून महत्वाचे प्रश्न, नेहमी विचारले जाणारे प्रश्न यांची माहिती घ्या.
- परिक्षा होईपर्यंत, अभ्यासासाठी घरातील शांत कोपरा निवडून त्या ठिकाणी आपले अभ्यासाचे साहित्य ठेऊन सराव व उजळणी करा.
- कमी वेळेत सगळंच वाचण्याचा अट्टाहास करू नका.
- परिक्षा होईपर्यंत, शक्य होईल तोवर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जसे की मोबाईल, टी.व्ही., गेम्स, आदींपासून स्वत:ला अलिप्त ठेवा. आपला मौल्यवान वेळ त्यात वाया जाणार नाही ह्याची काळजी घ्या.
- अभ्यास करताना संकल्पनात्मक शिक्षणावर भर द्या. आपण वाचत असलेल्या विषयातील संकल्पना स्पष्ट असणे महत्वाचे आहे. त्यासाठी काही आकृत्या, नोंदी, टीपा, तयार करून मूळ संकल्पना लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा.
- प्रकृतीची काळजी घ्या. स्वस्थ, सुदृढ आणि निरोगी असणे खूप महत्वाचे आहे. रिकाम्या पोटी केलेला अभ्यास लक्षात रहात नाही, त्यामुळे वेळच्यावेळी सकस, पौष्टीक आहार घ्या. शक्यतो घरचेच खा, बाहेरचे खाणे टाळा, म्हणजे प्रकृती उत्तम साथ देईल.
- शेवटच्या क्षणांपर्यंत अभ्यास पुढे ढकलू नका! आजपासूनच, परिक्षेसाठी उरलेल्या वेळेचे शिस्तशीर नियोजन करून त्याचे काटेकोर पालन करा. नियोजन करताना सर्वच विषयांना समान वेळ द्या पण थोडे कच्चे विषय अधिक मेहनतीने तयार करा.
- आपल्या विकासाची अनुभूती व सिंहावलोकन करून देण्याच्या प्रक्रियेत कोणतीही परिक्षा ही खूप महत्वाची भूमिका बजावत असते. त्यामुळे परिक्षेकडे भीती म्हणून न पाहता, स्वत:ला ओळखण्याची एक सुंदर संधी म्हणून पहावे, असे केल्याने आपण परिक्षेला तणावाने नव्हे तर आनंदाने सामोरे जाऊ शकतो.
- इयत्ता ९ वी पर्यंत विद्यार्थी केवळ वर्गातील, शाळेतील मित्र–मैत्रीणींसोबत स्पर्धा करत असतात मात्र १० वीच्या परिक्षेत विद्यार्थी त्यांच्या आयुष्यातील मोठ्या पातळीवरील स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत असतात. तेव्हा या महत्वाच्या टप्प्याला आत्मविश्वासाने सामोरे जा.
- सरते शेवटी परीक्षेची भीती आणि तणाव यांचे अवडंबर करू नये हे तर खरेच पण याचा अर्थ असाही नाही की परीक्षेचे कोणतेही गांभीर्य मानायचे नाही.

Lend-A-Hand India

**लेंड-अ-हँड इंडिया**

९, जीवन विहार हौसिंग सोसायटी, प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
पुणे, महाराष्ट्र – ४११ ०१६. दूरध्वनी : (०२०) २५६३ ००९२, ९५५२५ ९०२२६

E-mail : lahi@lend-a-hand-india.org | www.lend-a-hand-india.org